दै. लोकमत दि. 22/06/25

# महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडून उपविभागीय पोलीस अधिकारी नायक, पोलिस निरीक्षक भोईटे यांचे अभिनंदन

## गोरक्षणांच्या उल्लेखनीय कामांचे आयोगाकडून कौतुक



**हिमायतनगर/ता.प्रतिनिधी**

गोरक्षणांचे काम अतिशय चोखपणे करून नावलौकिक मिळविलेल्या पोलिस अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाकडून कौतुक व अभिनंदन केले असून गोरक्षणांचे उल्लेखनीय काम केल्याबद्दल उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक व पोलीस निरीक्षक भोईटे यांच्या कार्याचा गौरव आयोगाच्यावतीने करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अशासकीय सदस्य उद्धवजी नेरकर यांनी शासनातर्फे उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक व पोलिस निरीक्षक भोईटे इतवारा नांदेड यांना पाठवलेल्या गौरव पत्रात म्हटले आहे की, आपल्या राज्यात प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सुधारीत व प्राणी अत्याचार अधिनियम कायदा आणि तत्सम कायदे अस्तित्वात आहेत. आपल्या माध्यमातून, व कार्यकुशल कृतूत्वातून अनेक गोरक्षक यांनी गोवंश वाहतूकीच्या किंवा अन्य सुचना दिल्या असता आपण लगेच त्यावर नियमानुसार कारवाई कोणत्याही दडपणाखाली न येता कारवाई करूण आरोपींना तात्काळ अटक केली. अनेक अबोल जिवांची रक्षा केली. महाराष्ट्र शासनाने देशी गोवंशाचे धार्मिक, अर्थिक, सामाजिक, व वैज्ञानिक महत्व बघता देशी गायीला राज्य मातेचा दर्जा सुद्धा दिलेला आहे. महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाच्या माध्यमातून सुद्धा अनेक उपक्रम राबविले जात आहेत. शासकीय सेवेत असताना सुद्धा आपण पुढाकार घेऊन महाराष्ट्र शासनाच्या गोवंश हत्या बंदी कायद्यांची कडक व योग्य अंमलबजावणी केली. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, असे गौरवुद्गार आयोगाकडून काढण्यात येवून, यापुढे ही आपल्याकडून अशीच कारवाई अपेक्षित असल्याचे म्हटले आहे. दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक इतवारा नांदेड व पोलिस निरीक्षक इतवारा नांदेड भोईटे यांची नांदेड विभागांची टिम त्यांचे सहकारी विश्व हिंदू परिषद देवगीरी प्रांत तथा प्रांत गोशाळा संपर्क प्रमुख किरण सुभाषराव बिच्चेवार, जिल्हासह गोरक्षाप्रमूख श्रीधर शर्मा यांनी भेट घेऊन मनःपूर्वक सुभेच्छा दिल्या.

यावेळी शुभम ठाकूर, गणेश यशवंतकर, राज यादव, शुभम भिसे, अक्षय ठाकूर, योगेश वाकोडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.